# त्र्यं. वि.सरदेशमुख यांच्या कादंबरीतून तत्कालीन समाज व्यवस्थेचे चित्रण होते

## साहित्य अकादेमी, संगमेश्वर कॉलेज आणि मसाप पुण्याची सोलापूर शाखा यांच्या राष्ट्रीय परिसंवादात मान्यवरांनी मांडले विचार

जेष्ठ साहित्यिक प्राध्यापक त्र्यं. वि. सरदेशमुखांच्या कादंबरीतून तत्कालीन समाज व्यवस्थेचे चित्रण होते.असा सूर उद्घाटनानंतर च्या दुपारच्या पहिल्या सत्रात उमटला .सरदेशमुख यांचं संस्मरण या विषयावर सकाळचे मुख्य उपसंपादक रजनीश जोशी यांनी आपल्या आठवणी सांगितल्या. यामध्ये बापूंचा स्वभाव कसा मिश्कील होता .त्यांच शब्दवैभव आणि धडपडणार्या मुलांसाठी ते कसे आधारवड होते या हृद्य आठवणी त्यांनी सांगितल्या.

भाषेचं गारुड वाचकांवर घालणारी कलाकृती सरदेशमुख सरांनी निर्माण केली.असं नितीन वैद्य म्हणाले. डांगोरा आणि बखर एका राजाची यातील भाषाशैली अस्सल सोलापुरी शब्दांचा परिचय करून देणारी ठरली आणि बापूंच्या या शैलीचा संशोधक अभ्यासकानी नोंद करून ठेवावी असं कार्य त्यातून झालंय.असं आकाशवाणीचे सहायक संचालक कवी,लेखक सुनील शिनखेडे म्हणाले

पुण्याच्या मेधा सिधये यांनी कादंबऱ्यांतील व्यक्तिचित्रांचा वाचकांवर कसा प्रभाव पडतो. यातील खलनायक , सामाजिक क्षेत्रातील मवाळ माणसे, सरळ नीती मार्गाने जाणारी माणसे या सगळ्यांचा धांडोळा सरदेशमुख कसे घेत जातात आणि त्यातून वाचक कसा खिळून राहतो हे स्पष्ट केले. पहिल्या परिसंवादातील अध्यक्षस्थानावरून बोलताना चित्रपट समीक्षक विजय पाडळकर यांनी सरदेशमुखांचा आणि त्यांचा परिचय कसा झाला आणि त्यातून ते समृद्ध कसे होत गेले. यातून एकूणच साहित्याचा विचार,सामाजिक स्थित्यंतरे, कादंबऱ्यांमधून त्यांनी हाताळलेले विषय या सगळ्या बाबी आपल्या अध्यक्षीय मनोगतात मान्यवरांनी मांडलेल्या विचारांची दखल घेत त्यानीअभ्यासपूर्ण समारोप केला.

